दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २४ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २८० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# श्याम उच्च माध्यमिक विद्यालय दहिफळ (वड.) यांची बारावीच्या निकालाची यशाची परंपरा कायम

## विज्ञान शाखेचा व कला शाखेचा निकाल १०० %

**केज प्रतिनिधी-**केज तालुक्यातील दहिफळ (वड.) येथील शाम उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी कला व विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला असुन विद्यार्थ्यांनी यंशाची परंपरा कामय ठेवली आहे. शाम उच्च विद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी फेब्रु/मार्च २०२४ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही निकालाची परंपरा कायम राखली असून केज तालुक्यातून विज्ञान व कला शाखेत निकालाचा उच्चांक प्राप्त केला आहे.म.रा. उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांच्या वतीने फेब्रु/मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये विज्ञान तसेच कला शाखेचा १००% टक्के निकाल लागला. या मध्ये विज्ञान शाखेत विशेष प्राविण्य मिळविणारे १४७ विद्यार्थी आहेत व प्रथम श्रेणीत ६६ विद्यर्थ्यी आहेत तर कला शाख्येत विशेष प्राविण्यासह ३५ विद्यार्थी आहेत. तसेच विज्ञान शाखेतून कु शेळके श्रावणी अनिल हीने ९२.००% घेऊन प्रथम क्रमांक पटकवला व चि. शेटे तुषार बालासाहेब ९१.००% घेऊन द्वितीय क्रमांक तर कु. थोरात श्रेया संतोष हिने ९०.००% घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. तसेच कला शाखेतून कु. सुरवसे निकिता श्रीकिसन हिने ८४.००% घेऊन प्रथम क्रमांक पटकावला व चि. वरपे कृष्णा राजेंद्र याने ८२.११% घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तर चि. भोसले शेखर नारायण याने ८२.००% घेऊन तृतीय क्रमांक





मिळविला आहे .श्याम उच्च माध्यमिक विद्यालय दहिफळ (वड.) विज्ञान व कला शाखेतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव श्री शरद बप्पा गदळे, संस्थेचे अध्यक्ष डॉ.शशिकांत दहिफळकर व शाळेच्या प्राचार्या जयश्री ईप्पर तसेच प्रा.अध्यापनाचे अतिशय महत्त्वाचे कार्य पार पाडणारे उपप्राचार्य गंदगे आर. व्हि., सोळंके पी.एस,गपाट,एम. टी,. गायकवाड ,एम.जी.,राऊत टी. एम. मुंडे बी. एम.भालेराव डी. ए. कुटे व्ही. व्ही. सिरसाट एम. एस. खेडकर एच. बीं.मुंडे एस. पी. खाडे ए. एस.कदम मॅडम,मेहेत्रे मॅडम,नागरगोजे आर. सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# बीड जिल्हा ठरतोय का लाचखोरांचा बालेकिल्ला ?

## शेतात गाळ टाकण्याची परवानगी देण्यासाठी लाच घेताना कार्यकारी अभियंत्याला अटक तर अकृषी परवानगीसाठी लाच मागणारा नगररचनाकार फरार

**(बीड प्रतिनिधी)**

बीड दि. २२ बुधवारी एसीबीने केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये शेतात गाळ टाकण्याची परवानगी देण्यासाठी लाच घेताना पाटबंधारे विभागाच्या एका कार्यकारी अभियंत्याला बेड्या ठोकण्यात आल्या तर अकृषी पवानगीसाठी लाच मागितल्याप्रकरणी नगररचना कार्यालयात दोन खाजगी इसमांना एसीबीने अटक केली असून नगररचनाकार मात्र फरार झाला आहे. एसीबीच्या या कारवायांनी जिल्ह्यात खळबळ माजली आहे. एकेकाळी राज्याला राजकीय, सामाजिक नेतृत्व देणाऱ्या बीड जिल्ह्याला बदनाम करण्याचा घाट सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनी घातला आहे. बीड जिल्हा लाचखोरांचा बालेकिल्ला होतोय का असे विचारण्याची वेळ यावी अशी परिस्थिती जिल्ह्यात आहे. मागच्या आठवडाभरात एसीबीच्या कारवाईत जिल्ह्यातील ८ लोक अडकले आहेत प्रशांत शिवाजी डोंगरे (वय २९ रा. चन्नाटा फाटा, बीड) हा सहायक नगर रचनाकार असून त्याच्याकडे सध्या नगररचनाकार या पदाचा अतिरिक्त पदभार होता. तसेच निलेश सोपान पवार (वय २९, रा. आंतरवली बुद्रुक ता. गेवराई) हा अभियंत्याचा मदतनीस असून शेख नेहाल शेख अब्दुल गणी (वय ३० वर्षे रा. महेशाह नगर, बीड) हा अभियंता आहे. तक्रारदाराचे वेबंबधाट शिवारातील गट क्रमांक ५८० अ. (१) मधील २०.५० आर क्षेत्राचा अकृषिक परवाना काढण्यासाठी ऑनलाईन अर्ज बीपीएमएस पोर्टलवर



निलेश पवार याच्या मार्फत दाखल केला होता. बीडच्या उपविभागीय अधिकायांनी पुढील कारवाईसाठी तो नगर रचना कार्यालयात पाठविला. २६ मार्थ निलेश बाने प्रशांत डोंगरे याच्यासाठी ३० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. २ एप्रिल रोजी याची पंचासमक्ष खात्री करण्यात आली. त्यानंतर ४ एप्रिल रोजी डोंगरेने देखील लाथ मागितल्याचे सिद्ध झाले. त्यानंतर तडजोडीअंती १५ हजार रुपयांची लाच शेख नेहाल माथ्याकडे देण्यास सांगितली. याप्रकरणी निलेश पवार व नेहाल शेख यांना ताब्यात घेतले. तर डोंगरे हा फरार आहे. या तिघांविरोधातही बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. तर राजेश आनंदराव सलगरकर कार्यकारी अभियंता, माजलगाव पाटबंधारे विभाग) बाला ही २८ हजारांची लाच घेताना पकडले आहे. तक्रारदार व साक्षीदार आणि गावातील इतर पाच शेतकरी बांचे मौजे बिचोटी तलावातील बुडीत सेवातील गाळ व माती काढून शेतात टाकण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग येथे अर्ज दिला होता. सदर अर्जावरून मौने चिंचोटी तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्यासाठी परवानगी देण्यासाठी प्रत्येकी ५ हजार प्रमाणे सात जणांचे ३५ हजारांची मागणी करून तडजोड अंती प्रत्येकी ४ हजार प्रमाणे प्रत्येकी ७ जणांकडून २८ हजारांची मागणी करून सलगाकर याला सदर लाब घेताना रंगेहात पकडले आहे. दरम्यान चार लाचखोरांवर गुन्हा दाखल होत असल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. सदर कारवाई पोलिस अधीक्षक संदीप आटोळे, अपर अधीक्षक मुकुंद आधाय वांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक शंकर शिंदे, हनुमान गोरे, संतोष राठोड, स्नेहलकुमात कोरडे, गणेश मेहेत्रे आदींनी केली.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. च्या उन्हाळी सत्र परीक्षांना २४ मे पासून सुरुवात

**वादळवार्ता/बीड**

बीडः प्रतिनिधी- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बलभीम महाविद्यालय अभ्यास केंद्रात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बी.ए., बी.कॉम.,एम.ए. मराठी, हिंदी, लोकप्रशासन, ईतिहास, इंग्रजी या वर्गाची परिक्षा २४ मे २०२४ पासून सुरु होत आहे.

बलभीम महाविद्यालय अभ्यास केंद्रातील प्रवेश घेतलेल्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. मराठी, इंग्रजी, हिंदी, लोकप्रशासन, ईतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांचे हॉलटिकेट अभ्यास केंद्रात उपलब्ध आहेत तसेच परिक्षेचे वेळापत्रक बलभीम कॉलेज अभ्यास केंद्राच्या सुचना फलकावर लावलेले आहे. परिक्षेचे सकाळ च्या सत्राचे पेपर सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत तर दुपारच्या सत्राचे पेपर २.३० ते ५.३० या वेळेत होतील. विद्यार्थ्यांनी परिक्षेला येताना आपले हॉलटिकेट सोबत घेऊन यावे.

याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी असे आवाहन केंद्रप्रमुख तथा प्राचार्य डॉ. संतोष उंदरे, केंद्र संयोजक प्रा. एस.ए. सुरवसे, केंद्र सहाय्यक प्रा.बी.एस. यादव, तंत्रसहाय्यक प्रा. एस.बी. काळे यांनी केले आहे.



महाकारुणीक तथागत गौतम बुद्ध यांची जयंती महात्मा फुले नगर केज येथे मोठ्या हर्ष उल्हासाच्या वातावरणामध्ये साजरी करण्यात आली प्रसंगी फुलेनगर येथील सर्व बौद्ध उपासक उपासिका.

# जटाशंकर मंदिरातील शिवमहापुराण कथेतशिव-पार्वती सोहळा, शिवभक्त झाले वऱ्हाडी

**बीड : प्रतिनिधी**

बीड शहरातील जटाशंकर मंदिरात संभाजीनगर येथील कथाकार वसुंधरा पाठक यांच्या शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञात गुरूवारी सायंकाळी सात वाजता शेकडो शिवभक्तांच्या उपस्थीतीत शिव-पावर्ती सोहळा पार पडला. या विवाह सोहळ्यांनतर सामुदायीक आरती करण्यात आली. बीड शहरातील जटाशंकर मंदिरात रविवार १९ मे २०२४ पासुन संभाजीनगर येथील कथाकार सौ.वसुंधरा श्रीपाद पाठक यांच्या शिव महापुराण कथा ज्ञानयज्ञास सुरूवात झाली आहे. दररोज दुपारी ४ ते सायंकाळी ६ यावेळेत शिवमहापुराण कथेस भाविकांची गर्दी होत आहे. गुरूवारी कथाकार वसुंधरा पाठक यांनी समुद्र मंथन कथा, अमृत लक्ष्मी उत्पत्ती, निलकंठेश्वर भगवान ,नर्मदा मय्या उगम ,सती चरित्र, सतीचे यज्ञकुंडात समर्पण, पार्वती जन्म , पावर्ती तपस्या, शिव पावती विवाह कथा सांगीतली. शेकडो भाविकांनी या कथेचा लाभ घेतला . विवाह सोहळ्यांनतर साडेसात वाजता सामुदायीक आरती करण्यात आली. यजनाम गणेश कडेकर, कल्याण मुळे, दिनकर कुलकर्णी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत होते. सायकांळीसातवाजताशिवपार्वतीसोहळा जटाशंकर मंदिरात शिवमहापुराण कथेत सायंकाळी सात वाजता शिव-पार्वती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विवाहाच्या पूर्वसंध्येला सवाद्य शिव वरात काढण्यात आली. ही वरात कथास्थळी येताच भाविकांनी शिव-पावर्तीचे जोरदार स्वागत केले. बृम्हवृंदांच्या उपस्थीतीत मंत्रोच्चारात हा शिव पार्वती विवाह सोहळा पार पडला. या कथेच्या दरम्यान भगवान शिवाची वेशभुषा कु. आर्या मकरंद कुलकर्णी, तर पार्वतीची वेशभुषा कु. ईश्वरी दिनेश लिंबेकर या मुलींनी साकारली होती. आज रिध्दी-सिध्दी गणेश विवाह जटाशंकर मंदिरात आज शुक्रवार २४ मे रोजी दुपारी चार ते सहा या वेळेत रिध्दी सिध्दी गणेश विवाह ,तुलसी उत्पत्ती, त्रिपुरा सुर दहन, तुलसी गंगा उत्पती, या कथा होणार आहेत.



कविता

## बाप

बाप टिपूर चांदणं चांदणं
उभ्या आयुष्याच आंगण,
लेखाजोख्याचा रे हिशोब
कसा ठेवी मनात साठवून,

एका एका पै पै साठी
बाप करविती विनवन,
हात ओला सुका तरी
ठेवा मला हो गहान,

माझ्या बापाचं वागन
ताठ मानेच्या कण्यान,
वाकला जरी मणक्यान
रुबाब शिकवी स्वाभिमान ,

बाप अंधार हो उजेड
बाप पोर्णिमेवानी गोड,
फाटक्या हो संसाराचे
कसे लिपतो भगदाड,

बाप शेती वैरण,दावन,
कशी हाकतो रे मळण,
तुडवूनी पायी गरीबीला
ओटी भरतो खळयाला,

मनी जप रे रामाचा
पाव तु रे नवसाला,
दे रे बळ बाहूभुजा
जन्म सार्थकी होण्याला,

**कवी/साहित्यिक/समाजसेवक,**
**गजानन भागाजी दराडे**
**मु.तढेगाव पो.दुसरबीड**
**ता.सिंदखेड राजा**

# सोनिमोहा येथे २५ ते २९ मे किर्तन मोहत्सव व श्री भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

## मोठ्या संख्येने लाभ घ्या ह.भ.प. प्रकाश महाराज साठे

**वादळवार्ता/किल्लेधारूर**
धारूर तालुक्यातील सोनिमोहा येथे मातृपितृ स्मरणार्थ किर्तन मोहत्सव व श्री भागवत कथा सोहळ्याचे आयोजन २५ मे ते २९ मे या दरम्यान करण्यात आले असून मान्यवर संताची उपस्थीती लाभणार आहे डोंङ्गर पट्ट्यातील नागरीकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे अवाहन आयोजक ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांनी केले आहे. तालूक्यातील सोनीमोहा येथे या परीसरातील प्रसिध्द किर्तनकार प्रकाश महाराज साठे यांनी २५ ते २९ मे दरम्यान मातृपितृ स्मरणार्थ किर्तन मोहत्सव व श्री भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे भागवताचार्य संगीतातार्इ कोरडे या भागवत कथा संगणार आहेत.रोज मान्यवर किर्तनकाराचे किर्तन होणार आहे.या मध्ये २५ मे रोजी रामनाचार्य रामराव ढोक महाराज २६ मे रोजी रविवारी समाजप्रबोधनकार किर्तनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर, २७ मे सोमवारी गुरूवर्य अमृताश्रम स्वामी महाराज ,२८ मे मंगळवारी केशव महाराज घुले शास्त्री , याची किर्तने होतील ,तर २९ मे रोज बुधवारी संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थाचे प्रमुख अर्जूनराव महाराज लाड यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम होईल या किर्तन मोहत्सवाचा व भागवतकथेचा लाभ या डोंगरपट्ट्या तील भाविकानी घ्यावा असे अवाहन संयोजक ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांनी केले

# सुगंधकुट्टी बुद्धविहार येथे तथागत महात्मा गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात संपन्न

**वादळवार्ता/परळी**
तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या २५६८व्या जयंतीनिमित्त सुगंध कुट्टी बुद्धविहार परळी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण, तसेच सामूहिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले, सर्वप्रथम तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण उपासक सूर्यकांत



समिंदरसावळे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी भीम नगर जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, तसेच जयंती उत्सव पदाधिकारी,तसेच या भागातील बौद्ध उपासक,उपासिका,बालाक बालीका मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह पूर्ण वातावरणात जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला.

# हॉटेल साईतेजचा मोठ्या उत्साहात शानदार शुभारंभ

**वादळवार्ता/पिंपळवंडी**
बीड-अंमळनेर-अहमदनगर या प्रमुख महामार्गावरील जाटनांदुर फाटा येथे दि.२१ मे २०२४ मंगळवार रोजी हॉटेल साईतेज व्हेज-नॉनव्हेज या नवीन हॉटेलचा शुभारंभ संत मंहत व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.प्रथम प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे शुभहस्ते फित कापून व श्रीफळ फोडून नवीन हॉटेलचे



उद्घाटन करण्यात येऊन मान्यवरांनी नवीन व्यवसायाची भरभराट होवो अशी शुभकामना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.यावेळी यश भैया बाळासाहेब आजबे,सिंदफणा अर्बन बँकेचे अध्यक्ष आजिनाथ गवळी,जि.प.स.रामराव बडे,माजी जि.प.सदस्य कैलास जारे,माजी पं.स.उपसभापती शिरूर भाऊसाहेब धनवडे,सरपंच सचिन माने,मा. सरपंच किशोर जेधे,ग्रा.पं.सदस्य संजय डोंगर, तसेच बबनराव सुरे,तबाजी इंगळे, शहादेव गुजर,राजेंद्र सकुंडे,अमोल पोकळे,वैभव नवले,विष्णू भिलारे, संतोष कोळपकर,प्रशांत तांगडे, पत्रकार बबनराव उकांडे,सुनील जेधे, के.टी.पवार आदीसह विविध पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते,परिसरातील नागरिक,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आलेल्या पाहुण्यांचे व मान्यवरांचे स्वागत हॉटेलचे प्रोप्रायटर वसंत नाना पारखे व सागर पारखे यांनी पुष्पगुच्छ देऊन व फेटा बांधून केले.

# जरंडीत अग्नितांडव-चार एकर शेतीला आगीचा विळखा-मका जळुन चार लाखांचे नुकसान

**वादळवार्ता/सोयगाव**
शेतातील ११ के व्ही च्या मुख्य विजेच्या तारेवरील वीजपोलवर शॉर्ट सर्किट होऊन पडलेल्या ठिणगी मुळे चार एकर क्षेत्रातील शेतीला आग लागून शेतातील उभा मका जळून खाक झाल्या ची घटना बुधवार (दि.२२) दुपारी साडे तीन ते चार वाजेच्या सुमारास जरंडी शिवारात घडली या आगीत शेतातील उभा व कापणी करून ठेवलेल्या मक्याची चाळीस मिनिटाच्या आगीत राखरांगोळी झाली आहे यामध्ये शेतातील ठिबक सिंच व मक्याची कणसे जळून खाक झाली आहे या घटनेत मक्यासह चारा व ठिबक संच असे एकूण चार लक्ष रु चे नुकसान झाले असून घटनास्थळी तातडीने परिसरातील सुमारे शंभर जणांनी धाव घेऊन पळस पानांची गुच्छे घेऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केला परंतु आगीच्या विळख्यातून मका पिके सुटली नव्हती त्यामुळे अखेर सुमारे शंभर क्विंटल मक्याची शेतात राखरांगोळी झाली आहे

जरंडी शिवारात मंगलाबाई गुणवंत पवार यांच्या गट क्र-२४४ मधून महावितरण चे ११ के व्ही मुख्य वीज तारेचे पोल आहे या पोलवर अचानक दुपारी साडे तीन वाजेच्या सुमारास शॉर्ट सर्किट झाले व आगीचा विळखा सुरू झाला शॉर्ट सर्किटच्या ठिणग्यांनी उभा व कापणी करून ठेवलेल्या मक्याला आग लागली आगीने रौद्र रूप धारण केलेले असतांना परिसरातील शंभर युवकांनी जीव धोक्यात घालून आगीत शिरून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केला परंतु आग भीषण असल्याने मक्याच्या कणसांनी व उभ्या चाऱ्या ने पेट घेतल्याने चार एकर पैकी दोन एकर मधील शंभर क्विंटल मक्याची कणसे जागेवर जळून खाक झाली आहे तसेच शेताला लागलेल्या आगीत ठिबक संच



अंदाजे किंमत सत्तर हजार रु व मका असे एकूण चार लक्ष रु चे नुकसान झाले आहे तारतांत्री विकास सुस्ते यांनी घटनास्थळी धाव घेत घटनेची माहिती वरिष्ठांना दिली याप्रकरणी महावितरण ने घटनेचा पंचनामा केला असून आगीच्या भक्ष्यात सापडलेल्या दोन एकरवरील चार लक्ष रु चा मका व इतर साहित्य जळल्याचा पंचनामा केला आहे मात्र महसूल चा एकही अधिकारी घटनास्थळी आला नव्हता शंभर तरुणांनी वाचविला उर्वरित मका दरम्यान आगीचे लोळ दिसताच परिसरातील शंभर तरूणांनी पळस पानांचे गुच्छे घेऊन आगीत शिरून आगीतून दोन एकर वरील उर्वरित मका वाचविला आहे त्यामुळे शेतकऱ्यांचा सहा एकर वरील मका जळून झाक झाला असता -----शेतातून गट क्र-२४४ मधील ११ के व्ही च्या या मुख्य पोलवर नेहमी स्पर्किंग होतात अशी तक्रार शेतकरी प्रकाश पवार यांनी महावितरण कडे केली होती या मुख्य पोलवर अंतरही जास्तीचे आहे हे अंतर कमी करण्यासाठी मागणी केली होती परंतु महावितरणने या मागणीकडे दुर्लक्ष केले होते असा आरोप प्रकाश पवार यांनी केला आहे

जरंडीत झालेल्या आगीच्या घटनेचा प्राथमिक नुकसानी चा अहवाल विद्युत निरीक्षक यांना पाठविण्यात आला आहे यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे अहवाल पाठविल्या नंतर नुकसान भरपाई देण्यात येईल
मोहसीन पठाण
कनिष्ठ अभियंता महावितरण
सोयगाव....

## बी.एस.एन.एल.गुत्तेदाराच्या हालगर्जीपणामुळे पाटोद्याच्या जनतेचे पाण्यामुळे हाल

# चक्क पाईपलाईनच्या नळीतुन बी.एस.एन.एलचा पाईप टाकला,गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**वादळवार्ता/तळोदा**

पाटोदा नगरपंचायत अंतर्गत बांगरवाडी तलावातून पुलाच्या पलीकडील शिवाजीनगर माऊली नगर भागाला पाच इंच पाईप लाईन द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून पाटोद्यात विना परवाना बी.एस.एन.एल.चे पाईप टाकण्याचे काम चालु असुन चक्क या काम करणाऱ्या एजन्सीने हालगर्जी पणा करुन पाणी पुरवठा होणाऱ्या पाच इंच पाईप लाईन मधुनच तीनशे ते चारशे फुट पाईप टाकला.यामुळे छत्रपती शिवाजी महाराज नगर,माऊली नगर व मांजरसुंबा रस्ताचा पाणी पुरवठा ऐन उन्हाळ्यात पंधरा दिवसापासून बंद पडला यामुळे या भागातील जनतेने खुप हाल झाले.बी.एस. एन.एलच्या गुत्तेदाराच्या हालगर्जी पणामुळे ऐन उन्हाळ्यात लोकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले.यामुळे संबंधित गुत्तेदाराच्या व एजन्सीच्या विरोधात पोलिसात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येवुन कारवाई करण्यात यावी अशी जनतेतून मागणी होत आहे.

पाटोदा नगरपंचायत अंतर्गत बांगरवाडी तलावातून छत्रपती शिवाजी महाराज नगर माऊली नगर व मांजरसुंबा रस्ता या भागाला पाच इंच पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता परंतु पाटोदा शहरात विनापरवाना अवैध मार्गाने बी एस एन एल चे पाईप टाकण्याचे काम चालू असून संबंधित गुत्तेदार व एजन्सी यांच्या हलगर्जीपणामुळे चक्क बी.एस. एन.एल पाईप हा पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप मधुनच टाकण्यात आला.यामुळे ऐन उन्हाळ्यात या भागातील जनतेला व लोकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागले. कसाबसा या भागातील जनतेला नगराध्यक्ष व नगरपंचायतने टँकर पाणी परवठा केला. यामुळे नगरपंचायतीच्या कर्मचारी यांना दुसरे काम सोडुन गेली आठ दिवस याच कामात गुंतुन रहावे लागले.यामुळे बी.एस.



एन.एलच्या गुत्तेदाराच्या हालगर्जी पणामुळे ऐन उन्हाळ्यात लोकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले. यामुळे संबंधित गुत्तेदाराच्या व एजन्सीच्या विरोधात पोलिसात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येवुन कारवाई करण्यात यावी अशी जनतेतून मागणी होत आहे.



जगाला शांतीचा संदेश देणारे महामानव,तथागत गौतम बुद्ध यांची आज बुद्ध पौर्णिमा कळमआंबा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष इब्राहिम पठाण, प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. छायाताई हिरवे तसेच गावातील सर्व लहान थोर बुद्ध उपासक उपासिका .

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा सचिव पदी अनिल वैरागे यांची निवड

## जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी केली पदाची घोषणा

**वादळवार्ता/केज**

राष्ट्रीय स्तरावर संपूर्ण देशभर काम करणार्या पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा सचिव पदी अनिल लिंबाजी वैरागे यांची निवड करण्यात आली आहे. पुरोगामी विचारांचा वारसा जपण्यासाठी व पुरोगामी विचारांची चळवळ तेवत ठेवण्यासाठी या पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली असून गेल्या सहा वर्षांमध्येच या पत्रकार संघाच्या शाखा संपूर्ण देशामध्ये प्रत्येक राज्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन झाल्या आहेत. याच विचाराचा प्रचार आणि प्रसार तसेच पत्रकारांच्या हितासाठी योग्य निर्णय व्हावेत यासाठीच संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांनी पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली आहे.

याच पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा सचिव पदी अनिल वैरागे यांची दिनांक 22 मे 2024 रोजी जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी निवड जाहीर केली.संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय



सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव ,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर,उपाध्यक्ष मुबशिर खतिब यांच्या आदेशानुसार अनिल वैरागे यांची जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी निवड जाहीर केली.

अनिल वैरागे यांच्या निवडीचे मित्रपरिवार व पत्रकार बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# केज येथे केविसंसचे एक तास बस रोको आंदोलन

**वादळवार्ता/केज**

केज येथे बसडेपो तात्काळ सुरू करा व केज बसस्थानकातील प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडवा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने बसगाड्यांना बसस्थानकात प्रवेश करण्यापासून रोखण्यात आले. तब्बल एक तास समितीने एकही बसगाडी बसस्थानकात येऊ दिली नाही. केज हे जुने तालुक्याचे ठिकाण असताना बीड जिल्ह्यात एकमेव तालुका ठिकाण आहे जिथे बसडेपो अस्तित्वात नाही. याउलट केज हे जिल्ह्यातील एकमेव शहर आहे जे खामगांव-पंढरपूर व अहमदपूर -अहमदनगर या महामार्गांच्या जोडणीवर आहे. त्यामुळे येथून हजारो प्रवाशी दररोज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करतात. मात्र येथे बसडेपो नसल्याने बसगाड्यां चे व्यवस्थापन योग्य प्रकारे होत नाही. केज मध्ये अनेक वर्षांपासून बसडेपो साठी सात एकरहून अधिक जागा बीड रोडलगत आरक्षित आहे. मात्र परिवहन मंडळाच्या दुर्लक्षित पणा व हलगर्जीपणामुळे ही जागा अतिक्रमित होऊ लागली आहे. यासाठी समिती गेली अनेक वर्षे केज शहरात बसडेपो कार्यान्वित करण्याची मागणी करत आहे. याशिवाय केज बसस्थानकात प्रवाशासाठी सुरू असलेली बस आरक्षण सुविधा मधेच धारूर येथे हलविण्यात आली आहे. डिजिटल विश्व गतिमान होत असताना राज्य परिवहन मंडळ नागरिकांना असुविधा निर्माण करत आहे. याशिवाय बसस्थानकाला संरक्षक भिंत नसल्याने चोऱ्याचे प्रमाण व अस्वच्छता वाढली आहे. दररोज महिला प्रवाशांच्या दागिने चोरीच्या घटना घडत आहेत. बसस्थानक नियंत्रक व पोलीस विभाग यांच्यात समन्वय नसल्याने येथील नव्याने बनवलेली पोलीस चौकी शोभेचे ठिकाण बनले आहे. बसस्थानकातील सौचालये अत्यंत वाईट अवस्थेत आहे. ते नव्याने बांधण्यात यावे. बसस्थानकाचे दोन्ही प्रवेशद्वार हे अतिक्रमनाने वेढली असून बसस्थानकात चालकांना बसगाड्या ने-आण करण्यासाठी मोठा त्रास होत आहे. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्याचे याकडे दुर्लक्ष होत आहे. यासमस्या त्या त्या पातळीवर तात्काळ सोडण्यात येतील असे लेखी आश्वासन दिल्यानंतर समितीने बेमुदत बसरोको आंदोलन मागे घेतले. यावेळी परिवहन मंडळाचे धारूर आगार प्रमुख श्री चौरे हे उपस्थित होते. दिलेल्या विहित मुदतीत मागण्या पूर्ण न केल्यास पुन्हा तीव्र आंदोलन



करण्याचा इशारा समितीचे समन्वयक हनुमंत भोसले यांनी दिला आहे. आंदोलनात हनुमंत भोसले यांच्यासह नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे व अनेक नागरिक सहभागी होते.

## १२ वीच्या परीक्षेत जवळा उच्च महाविद्यालयातून चि. सुरज वाव्हळ प्रथम

**वादळवार्ता/बीड**

फेब्रुवारी मार्च २२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल काल मंगळवार दि. २१ रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये बीड शहरा पासून जवळ असलेल्या जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून चि. सुरज बाळासाहेब वाव्हळ याने ८०.००% गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याने मिळवलेल्या या उज्वल यशाबद्दल त्याचे संस्थेचे संस्थाचालक माजी आमदार श्री. राजेंद्र जगताप साहेब, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग आणि त्याच्या आई-वडील यांच्यासह मित्र परिवारांनी त्याचे अभिनंदन केले.

विद्यार्थी देशातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा समजला जाणारा इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल बारावी काल मंगळवार दिनांक २१ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. या परीक्षेत बीड शहरापासून जवळ असलेल्या म्हाळस जवळा येथील जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला. या मध्ये शांत, संयमी आणि हुशार अशी ओळख असलेल्या चि. सुरज वाव्हळ



याने ८०.०० टक्के गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळवला. चि. सूरज हा लहानपणापासून जिद्दी आणि मेहनती विद्यार्थी होय. त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आणि गरिबीची आहे. अशा या हलाखीच्या आणि गरिबीच्या परिस्थितीत त्याने जिद्दीने अगदी मन लावून अभ्यास केला. १२ वीच्या परीक्षेत मिळालेल्या या घवघवीत यशात त्याने आपल्या आई-वडिलांसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापकांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. त्याच्या या घवघवीत यशाबद्दल त्याचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जगताप साहेब यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळ, प्राचार्य भगवानराव गव्हाणे, पर्यवेक्षक रमेशराव डोळे, वरिष्ठ लिपिक शेख सर यांच्यासह प्रा. बी.टी. जोगदंड , प्रा. ए. एस.पटवारी, प्रा. जी. बी. घुमरे, प्रा. एन. के. चंदनशिवे आणि माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. तसेच म्हाळस जवळा आणि पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमी पालक आणि नागरिकांनी सुरज वाव्हळ याच्यासह महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षक प्राध्यापक वर्गाचे अभिनंदन करून कौतुक केले .

# नितीन काळे यांचा तलावात बुडून मृत्यू!

**वादळवार्ता/येवता**

दि. २३ केज तालुक्यातील जिवाची वाडी येथील साठवण तलावात दुपारी १२ वाजता मासे धरण्यासाठी गेले नितीन मच्छिंद्र काळे वय-३४ वर्ष यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला त्यांना पोहता येत होते!परंतू ते मासे पकडण्याच्या जाळ्यात



अडल्याने त्यांचा मृत्यू झालेचे प्रथम माहिती वरून दिसून येते मृत्तदेह शोधन्यासाठी परळी-वै. येथील बचावकार्य पथकास पाचारन केले.

सध्याकाळी ६:३० वाजेपर्यंत बचावकार्य पथक घटनास्थळी दाखल झालेले नव्हते तलाठी सज्जा जिवाची वाडी,उत्रेश्वर घुले घटनास्थळी दाखल.

# पुस्तक वाचताना माणूसही वाचता यायला हवा-श्रीपाल सबनीस

## डॉ.विठ्ठल जाधव राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराने सन्मानित

**वादळवार्ता/शिरूर कासार**

पुस्तके वाचतानाच माणूसदेखील वाचता यायला हवा. त्याने शहाणपण येते तर आजच्या राजकीय पातळीचा विचार करता प्रगल्भ लोकशाहीसाठी लेखक, कलाकार यांची जबाबदारी वाढली आहे असे प्रतिपादन विवेकवादी विचारवंत, ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी पुणे येथे दि.५ रोजी आयोजित राज्यस्तरीय चैत्रपालवी काव्य पुरस्कार वितरण प्रसंगी केले.

शिरूर कासार येथील बाल साहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' बालकविता संग्रहास चैत्रपालवी राज्यस्तरीय मराठी साहित्य पुरस्काराने श्रीपाल सबनीस यांचे हस्ते एस.एम.जोशी सभागृह, पत्रकार भवन, पुणे येथे गौरविण्यात आले. डॉ.विठ्ठल जाधव यांच्या उंदरीन सुंदरीन, बटाटीची धार, पांढरा कावळा या कलाकृतींसह बालसाहित्य या अवघड विषयाकडे 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाच्या निमित्ताने वाचकांचे लक्ष वेधले आहे. जाधव यांची साहित्यकृती दखलपात्र ठरली आहे. दत्ता डांगे (नांदेड) आणि चित्रकार शीतल शहाणे यांनी परिश्रमपूर्वक ही कलाकृती पुस्तकातून साकारली आहे. पुरस्कार वितरण प्रसंगी जेष्ठ साहित्यिक बबन पोतदार, प्राचार्य हनुमंत धालगडे, कवी चंद्रकांत जोगदंड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.यावेळी राजेंद्र जेधे, व्यंकटराव वाघमोडे, ओंकार जेधे, रूपाली अवचारे यांचेसह महाराष्ट्रातील नामवंत कवी लेखक उपस्थित होते. सुत्रसंचलन आशा शिंदे यांनी केले. तर आभार आनंद गायकवाड यांनी मानले.



# धारुर शहरातील भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचारी व अधिका-यांच्या मनमानी कारभाराला खातेदार वैतागले.



**वादळवार्ता/किल्लेधारुर**
धारूर शहरातील तेलगाव रस्त्यावर असणारे भारतीय स्टेट बैंक शाखेत अधिकारी व कर्मचारी यांची मनमानी वाढल्याने खातेदार वैतागून गेले असून सकाळी साडेदहा ते चार हाच वेळ बँक चा ग्राहकाचे कारभारा साठी करून बँक कुलूप बंद करून कर्मचारी ग्राहक व खातेदाराशी अरेरावीची भाषा सतत वापरी जात असल्याने सर्व खातेदार व ग्राहक वैतागून गेले असून तात्काळ वरिष्ठ अधिका- यांनी येथील मनमानी कारभार तात्काळ थांबवावा अशी मागणी होत आहे. धारूर शहरात भारतीय स्टेट बँकेच्या दोन शाखा आहेत तेलगाव रस्त्या वर असणारी शाखा जुनी आहे ,शासकीय योजना व व्यापारी वर्गाचे या शाखेशी मुख्य व्यवहार आहेत मात्र गेल्या दोन तिन महिण्यापासून येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या गलथान व मनमानी कारभाराला सर्व ग्राहक व खातेदार वैतागून गेले आहेत. खातेदाराचे कुठलेच काम वेळेवर होत नाही .अरेरावी व मनमानी मात्र सहन करावी लागते. सकाळी दहा ते साडेपाच कार्यालयीन वेळ असताना पैशाचे व्यवहार चारला बंद होताच ,बँके ची दारे बंद करून ग्राहकाचा खातेदाराचा प्रवेश बंद केला जातो ,खातेदार ग्राहक आला तर बँक वेळ संपला असे बंद दारातून सांगून खातेदाराला हाकलले जाते त्यामुळे येथील कर्मचारी व अधिकारी यांचे मनमानी कारभाराचा कळस झाला असून ग्राहक वैतागून गेले आहेत तात्काळ येथील मनमानी थांबवावी व ग्राहकाना न्याय द्यावा आशी मागणी खातेदार वर्गातून होत आहे.

# मौजे वाई येथे खरीप हंगाम पूर्व नियोजन गाव बैठक संपन्न.

**वादळवार्ता/वाई**
दि. २२/५/२०२४ रोजी मौजे वाई ता.मुदखेड येथे खरीप हंगाम पुर्व नियोजन गाव बैठक आयोजित करण्यात आली व त्या बैठकीत मुद्खेड तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी मुद्खेड श्रीमती डॉ. अमरज्योती गच्चे मॅडम यांनी माती तपासणी करूण, , त्यानुसार रासायनिक खते व सेंद्रीय खते यांचा संतुलित वापर करणे, सोयाबीन बियाणे उगवण क्षमता चाचणी, बिजप्रक्रीया कसी करावी व त्यांचे फायदे, सोयाबीन वरील विविध किडी व रोग कसे ओळखावे,पिवळा मोझॅक नियंत्रण, जैविक बुरशीनाशके निंबोळी अर्क यांचा वापर करणे, बि. बि. एफ. पध्दतीने व टोकण पद्धतीने सोयाबीन पिकाची लागवड करणे तसेच तुर पिकाची टोकण पद्धतीने लागवड करावी व कापूस फरदड नियंत्रण गुलाबी बोंड अळी नियंत्रण करणे तसेच यावर्षीच्या खरीप हंगामात सोयाबीन व कापूस पिकाचे कोणत्या वाणाची निवड करावी व खरेदी करताना कृषी सेवा केंद्र यांच्याकडुन



बियाणे खरेदी केलेली पक्की पावती घेणे आवश्यक इत्यादी विषयांवर सखोल व सविस्तर असे मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले. तसेच तालुक्यातील कृषी अधिकारी श्री.जे.डी.पवार साहेब यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सोयाबीन पिकावर येणाऱ्या शंखी गोगलगाय यावरील उपाय योजना,मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना शेततळे, MREGS फळबाग लागवड, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड, खरीप हंगामात खतांचे नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली.व सोयाबीन बियाणे उगवण क्षमता प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले व तसेच बियाण्याच्या उगवण क्षमते नुसार बियाण्याचे प्रमाण कमी जास्त करण्याविषी सांगितले.त्यावेळी तालुका कृषी अधिकारी श्रीमती डॉ. अमरज्योती गच्चे मॅडम कृषी अधिकारी श्री. जे. डी. पवार साहेब मंडळ कृषी अधिकारी श्री.पि.टी.हिलालपुरे साहेब कृषी सहायक श्रीमती शिल्पा शिंदे व वाई गावातील प्रगतीशील शेतकरी व महीला शेतकरी उपस्थित होते.

# गुरूकुल इंग्लिश स्कुल मध्ये सीबीएससी मध्ये 92 टक्के घेवुन गणेश घुगे उत्तीर्ण



**वादळवार्ता/बीड**
बीड येथिल गुरूकुल इंग्लिश स्कुलमधील विदयार्थी गणेश लक्ष्मण घुगे यांनी सीबीएससी मध्ये ९२ टक्के गुण घेऊन पहिल्या दहा मध्ये उत्तीर्ण झाला असुन या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असुन त्याचा ठिकठिकाणी ह्रदयसत्कार करण्यात येत आहे नेकनुर येथे त्याच्या यशाबद्दल त्याचा ह्रदयसत्कार करताना नेकनुर पोलिस स्टेशनचे बालासाहेब ढाकणे,कालिदास सारूक,लालासाहेब ढाकणे डॉ योगेश ढाकणे,यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला व त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# धारूर येथे आर्यवैश्य कोमटी समाजाच्या पहिल्या जिल्हा स्तरीय पालक मेळावा व स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन

## वासवी कुटुंबसंघ पुस्तिकेचेही होणार प्रकाशन

**वादळवार्ता/केज** महाराष्ट्र आर्यवैश्य महासभा बीड जिल्ह्याच्या वतीने किल्लेधारूर याठिकाणी आर्यवैश्य कोमटी समाजाच्या एकदिवसीय पालक मेळावा व स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन रविवार दि 26 रोजी करण्यात आले आहे यावेळी जिल्ह्यातील समाजबांधवांची माहिती असलेल्या वासवी कुटुंबसंघ या पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुमित रुद्रवार व सचिव वैभव झरकर यांनी दिली आहे

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार हे राहणार आहेत . मुख्य मार्गदर्शक म्हणून विवाह व समाजातील वाढते घटस्फोट याविषयावर जेष्ठ पत्रकार सुशील कुलकर्णी हे मार्गदर्शन करणार आहेत . यावेळी अन्न व औषध प्रशासन पुणे येथील सहाय्य्क आयुक्त शामसुंदर प्रतापवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे तसेच गोदरेज प्रा. ली. येथे वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले निलेश कोटलवार , बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार , राज्य संघटक प्रदीप कोकडवार , महिला महासभेच्या अध्यक्षा माधुरी कोले , महिला महासभेच्या कार्याध्यक्षा सुलभा वट्टमवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे

दोन सत्रात विभागलेल्या या कार्यक्रमातील पहिल्या सत्रात वासवी कुटुंबसंघ या पुस्तिकेचे प्रकाशन , विवाह व समाजातील वाढते घटस्फोट याविषयावर मार्गदर्शन व खुली चर्चा होणार आहे तर दुसऱ्या सत्रात स्नेहमिलन कार्यक्रमाच्या माध्यमातून किल्लेधारूर येथील महिला गणेश वंदना व वासवी कन्यकादेवी जीवनगाथा , माजलगाव येथील महिला महिमा नारीशक्तीचा , अंबाजोगाई येथील महिला , डिजिटल महाराष्ट्र माझा , बीड येथील महिला संस्कार आईवडिलांचे , तर परळी वैजनाथ येथील महिला आनंदयोग या विषयांवर नृत्य व कला सादर करणार आहेत

तरी किल्केधारूर येथील नगरेश्वर मंदिर येथे आयोजित या समाजहितपयोगी कार्यक्रमास जिल्ह्यातील समाजबांधवांनी कार्यक्रमाचा उद्देश सफल करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सूर्यकांत महाजन , अभय भावठणकर , आनंद भावठणकर , सौ प्राजक्ता गुंडेवार , सौ सुप्रिया चिद्रवार यांनी केले आहे

# सोयगावला ४६ हजार ८५२ पाठ्य पुस्तकांचा पुरवठा

## शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळणार तेरा हजार ५७४ विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके

**वादळवार्ता/सोयगाव**
जिल्हा परिषदेच्या मोफत पाठ्यपुस्तक योजना -२०२४-२५ अंतर्गत सोयगावला इयत्ता पहिली ते आठवीच्या तेरा हजार ५७४ विद्यार्थ्यांसाठी बुधवारी सोयगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी विभागाला ४६ हजार ८५२ पुस्तकांचा पुरवठा करण्यात आला आहे त्यामुळे शैक्षणिक सत्राच्या पहिल्या च दिवशी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकं मिळणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढव यांनी सांगितले आहे

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या सोयगाव तालुक्यातील १२० प्राथमिक शाळा सेमी इंग्रजी होणार आहे त्यामुळे सेमीच्या विद्यार्थ्यांना चार हजार तिनशे साठ पुस्तके प्राप्त झाली आहे तर मराठी माध्यमाची ३९ हजार ५४७ पुस्तके प्राप्त झाली आहे उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना ही २ हजार ९४५ पुस्तके सोयगाव ला प्राप्त झाली आहे दरम्यान ही मोफत पाठ्य पुस्तक योजना पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १२० प्राथमिक शाळा आहे पहिल्या वर्गासाठी शाळा सुरू होण्यापूर्वी च पहिलीच्या वर्गात १५०५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे शाळापूर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे त्यामुळे पहिली च्या १५०५ विद्यार्थ्यांसह उर्वरित इयत्तेच्या तेरा हजार ५७४ विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके मिळणार असून गटशिक्षणाधिकारी कार्यालयात प्राप्त पुस्तकं येत्या तीन दिवसात केंद्रास्तरावर पुरवठा करण्यात येणार आहे याकामी गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,परमेश्वर कठोरे, सुनील बावचे, सचिन पाटील आदी पुढाकार घेत आहे...



दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )